Your complimentary use period has ended. Thank you for using PDF Complete.
Click Here to upgrade to Unlimited Pages and Expanded Features

# कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे “राष्ट्रीय संविधान दिवस” साजरा

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ येथे आज दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजी ñराष्ट्रीय संविधान दिनò साजरा करण्यात आला. तसेच या कार्यक्रमामध्येच एक भारत श्रेष्ठ भारत हया अभियाना मधून राष्ट्रीय एकात्मता विषयी मार्गदर्शन करण्यात आले.

वसंतराव नाईक कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्याल यवतमाळ येथील सहयोगी अधिष्ठाता, व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एन. डी. पार्लावार, यांनी आपले अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना भारतीय संविधानामध्ये मसुधा समीतीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर व घटना समीतीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद होते. संविधान निर्मीतीमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अब्दुल कलाम आजाद, डॉ. पंजाबराव देशमुख यांनी महत्वाची भुमीका बजावली होती. संविधान निर्मीतीला दोन वर्ष अकरा महीने अठरा दिवस लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जगातील अनेक लोकशाही देशांचा अभ्यास करून व अथक परिश्रम घेवून संविधानाची निर्मिती केली असे सांगितले. संविधानाने नागरिकांना समता, बंधुता व न्याय देण्याचे काम केले आहे. शेतकरी, गरिबांना शिक्षण व आरोग्य मिळणे काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले. देशातील नागरिकांना देशा प्रति आस्था असण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले. तसेच विद्यार्थ्यांनी कठीण परिश्रम घेवून स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करावा व विद्यापिठाचे व महाविद्यालयाचे नाव लौकीक कसे करता येईल या कडे लक्ष दिले पाहिजे असे आवाहन केले.

या वेळी मंचकावर प्रा. अंजली गहरवार, प्रा. धिरज वसुले, डॉ. रविंद्र सातभाई, डॉ. प्रशांत शिंगोटे, सहाय्यक कुलसचिव, श्री. मंगेश शेटे उपस्थित होते.

त्यानंतर संविधानाची प्रस्तावना वाचून अमंलबजावणी करण्याकरिता विद्यार्थी व शिक्षक यांनी प्रतिज्ञा घेतली.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. मृदुल धकाते हिने केले. आभार प्रदर्शन कु. रश्मी ताथोड या विद्यार्थीनीने केले. बंगालची विद्यार्थीनी कु. किर्ती सिन्हा व तेलंगणाचा विद्यार्थी वामशी यांनी आपले मनोगत त्यांच्या मातृभाषेत व्यक्त केले. या वेळी महाविद्यालयाचे डॉ. संदेश बांगर, प्रा. हेमंत वाघ, डॉ. रोशन शिंदे, श्री रूपेश राऊत, एकनाथ भंकाळे, दिपाली शिंदे, भारती मेश्राम, अस्मिता पाटील, शुभम धार्मिक, रेखा ठाकरे, तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठया प्रमाणात उपस्थीत होते.